# वैज्ञानिक प्रतियोगितेत दक्षायणी राज्यात पहिली

▶ **भुसावळ (वा.)** मुंबई येथे २०२५-२६ डॉ. होमी भाभा फाउंडेशनतर्फे आयोजित बाल वैज्ञानिक प्रतियोगितेत भुसावळची ताप्ती पब्लिक सीबीएसई इंग्लिश मीडियम स्कूलची विद्यार्थिनी दक्षायनी सुबोध सपकाळे हिने ग्रेट लेव्हल टू चे प्रमाणपत्र मिळवून राज्यात पहिली येण्याचा बहूमान मिळवला आहे.

ही प्रतियोगिता मुंबई सायन्स टीचर असोसिएशनतर्फे पार पडली. या प्रतियोगितेत देशभरातील हजारो विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. या प्रतियोगितेत दक्षायणी सपकाळे हिने आपले वैज्ञानिक विचार आणि कौशल्य दाखवले त्या बद्दल तीला ग्रेट लेव्हल टू चे प्रमाणपत्र व शिल्ड देऊन




राज्यात पहिली येण्याचा बहुमान मिळाला आहे. दक्षायणी सपकाळे ही ताप्ती पब्लिक स्कुलची इयत्ता ५ वी तील या प्रतियोगितेत यश मिळवणारी जिल्ह्यातून एकमेव विद्यार्थीनी आहे. तिच्या यशाबद्दल प्रिन्सिपल निना कटलर, श्रद्धाली घुले, मनप्रीत कौर व मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

जळगाव तरुण भारत
09 Feb 2026 - Page 12
epaper.tarunbharatlive.com

# बालवैज्ञानिक स्पर्धेत दक्षायनी सपकाळे राज्यात प्रथ

**भुसावळ** : मुंबई येथे डॉक्टर होमीभाभा फाउंडेशन व मुंबई सायन्स




टीचर असोसिएशनतर्फे आयोजित बालवैज्ञानिक स्पर्धेत येथील तापी पब्लिक सीबीएसई इंग्लिश मीडियम स्कूलची विद्यार्थिनी दक्षायनी सुबोध सपकाळे हिने ग्रेट लेव्हल टूचे प्रम ाणपत्र मिळवून राज्यात प्रथम येण्या बहुमान मिळविला. स्पर्धेत दक्षायनी सपकाळे हिने वैज्ञानिक विचार आणि कौशल्य दाखवले. ती स्पर्धेत यश मिळवणारी जिल्ह्यातून एकमेव विद्यार्थिनी आहे. तिचा या यशाबद्दल प्राचार्या निना कटलर, उपप्राचार्या श्रद्धाली घुले, मनप्रीत कौर यांच्यासह शिक्षकांनी गौरव केला. दरम्यान, आता दक्षायनी सपकाळेची ग्रेट इंक्झामसाठी निवड झाली असून, तिला इस्त्रोच्या दौऱ्यासाठ तिरुअनंतपुरम येथे नेण्यात येणार असून, तेथे १२ हजारांचे रोख व ट्रॉफी तसेच सन्मानचिन्ह असे बक्षीस देण्यात येणार आहे. तिला शिक्षक व वडील सुबोध सपकाळे यांचे मार्गदर्शन लाभले.

# बाल वैज्ञानिक स्पर्धेत सपकाळे राज्यात प्रथम

**भुसावळ, ता. ७ :** येथील ताप्ती पब्लिक स्कूलची इयत्ता पाचवीतील विद्यार्थिनी दक्षायनी सपकाळे हिने डॉ. होमी भाभा फाउंडेशन व सायन्स टिचर असोसिएशन यांच्या वतीने मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या बाल वैज्ञानिक स्पर्धेत 'ग्रेट लेव्हल-टू'चे प्रमाणपत्र मिळवत राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

या स्पर्धेत देशभरातील विद्यार्थी सहभागी झाले होते. आपल्या वैज्ञानिक विचारशक्ती, प्रयोगशीलता व कौशल्याच्या बळावर दक्षायनी हिने परीक्षकांचे लक्ष वेधून घेतले. उत्कृष्ट कामगिरीबद्दल तिला 'ग्रेट लेव्हल-टू'चे प्रमाणपत्र व शील्ड प्रदान करण्यात आले.

या यशाबद्दल ताप्ती पब्लिक स्कूलच्या प्राचार्या निना कटलर, उपप्राचार्या श्रद्धाली घुले तसेच शिक्षिका मनप्रीत कौर यांनी तिचे अभिनंदन केले. स्पर्धेतील यशानंतर दक्षायनीची पुढील फेरीसाठी निवड झाली असून, तिला इस्त्रोच्या शैक्षणिक दौऱ्यासाठी तिरुअनंतपुरम येथे नेण्यात येणार आहे. या दौऱ्यात तिला १२ हजार रुपये रोख बक्षीस, ट्रॉफी, सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देण्यात येणार आहे.




भुसावळ : ताप्ती पब्लिक स्कूलची विद्यार्थिनी दक्षायनी सुबोध सपकाळे हिने राज्यात पहिला येण्याचा बहुमान मिळविल्याबद्दल तिचा शील्ड देऊन सन्मान करताना प्राचार्या नीना कटलर.